MHBH090013412022

संक्षिप्त फौ.प्र.क्र.७८३/२०२२
शासन –वि.– गणेश
न्यायनिर्णय (निशाणी ६ खाली)

# न्यायनिर्णय

(पारित दिनांक ०४ सप्टेंबर, २०२३)

१. दिनांक २५/०८/२०२२ रोजी १९.०० वाजेच्या दरम्यान मौजा सरदार वार्ड तुमसर येथे आरोपी गणेश शिवशंकर समरित याच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभट्टी मोहादारू बेकायदेशीरपणे विनापरवाना मिळून आली व म्हणुन त्याच्याविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वये अपराधाच्या आरोपांसाठी सदरचा खटला संक्षिप्त संपरिक्षेने चालविण्यात आलेला आहे.

२. अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता व बचाव पक्षाचे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वरील सर्व पुराव्याचा विचार करता पुढील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले असुन त्याबाबतची कारणमिमांसा आणि निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १) | दिनांक २५/०८/२०२२ रोजी १९.०० वाजेच्या दरम्यान मौजा सरदार वार्ड तुमसर येथे आरोपी गणेश शिवशंकर समरित याच्या ताब्यातुन ७५ लिटर हातभट्टी मोहादारू बेकायदेशीरपणे विनापरवाना मिळून आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | : | **...नकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | : | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करिता :–**

४. सदर प्रकरणातील तारांकीत साक्षदार सा.क्र.१ कौशिक संजय ईलमे हा दारू नमुना जप्ती वरील पंच साक्षदार होय. त्याच्या सांगण्याप्रमाणे तो आरोपीला ओळखत नाही. पोलीसानी त्याला छापा टाकण्यासाठी पंच म्हणून कुठेही बोलाविले नाही व त्याच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्याच्या सह्या घेतल्या. पंच साक्षदार फितुर झाल्याने सरकार पक्षास जप्ती ही संशयापलीकडे जावून सिध्द करता आलेली नाही. त्याकरिता अन्य साक्षदारांना तपासुनही अभियोग पक्षास उपयोग होणार नाही. तरी देखील न्यायालयामार्फत अन्य साक्षीदारांना समन्स पाठवण्यात आले. सरकार पक्षास त्या साक्षीदारांची उपस्थिती नोंदवता आली नाही. कुठलाही सबळ पुरावा अभिलेखावर उपस्थित नाही. म्हणून सर्व साशंकतेच्या पलीकडे गुन्हा सिद्ध करण्यास अभियोग पक्षास यश येत नाही.

५. महाराष्ट दारूबंदी कायदाचे कलम १०३ अन्वये एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात अंमली पदार्थ आढळून आल्यास व तो त्याचे समाधानकारक उत्तर देत नसल्यास, कुठल्याही पुराव्याव्यतिरिक्त सदर व्यक्तीविरूध्द त्याने सदर अंमली पदार्थबाबत गुन्हा केला आहे असे गृहितक आहे. परंतू प्रस्तूत गुन्हयात जप्ती हिच संशयाच्या पलीकडे जावून अभियोग पक्ष सिध्द करू शकला नाही. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही पुढील साक्षदार तपासण्यात आले नाही. आरोपीविरूध्द पुरेशे पुरावे मिळून न आल्यामुळे त्याचे ३१३ खाली नोंदविण्यात येणारे बयान नोंदविण्यात आले नाही.

६. या सर्व कारणांमुळे साशंकतेच्या पलीकडे गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्षास यश येत नाही. म्हणुन मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरास खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१) आरोपी गणेश शिवशंकर समरित याला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५८ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदाचे कलम ६५(ई) अन्वये अपराधाच्या आरोपांतून

निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) फौजदारी प्रक्रीया संहीतेचे कलम ४३७ (अ) प्रमाणे पुर्तता करण्यासाठी आरोपीने रक्कम रुपये ५,०००/— चा वैयक्तीक बंधपत्र न्यायालयात सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

स्वा/—
(श्रीमती पी.ए. राजपुत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२, तुमसर.

दि. ०४/०९/२०२३.
तुमसर

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. B. Gajbhiye |
| Name of the Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Tumsar. |
| Date of judgment | : | 04/09/2023 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 04/09/2023 |
| Judgment uploaded on | : | 06/09/2023 |